# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/06/2023 (मंगळवार) दुपार


### जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०२ कि.मी अंतरावर बोरूजवाडा झोपडपट्टी येथे दिनांक २६/०६/२०२३ चे १५.०० वा. ते १५.३० वा. दरम्यान जखमी नामे — रूपेश मानिकराव रोकडे, वय २४ वर्ष, रा. सरासावरी ता. सौसर; मध्यप्रदेश हा त्याची पत्नी सौ. राणी हिला घेण्यासाठी फिर्यादी नामे— गणेश संपत परतेती, वय ३८ वर्ष, रा. सरासावरी ता. सौसर म. प्र. याचेसह सासुरवाडी बोरूजवाडा येथे दुपारी ०३.०० वा. आला असता **आरोपी नामे— बाबुराव विठोबाजी भोजन, रा. बोरूजवाडा हा** आजेसासरा असुन यास राणी घरी आली आहे का असे विचारले असता आरोपीने त्यास अश्लील शिवीगाळ करून तुम्ही नेहमीच झगडे भांडण करता असे म्हणुन शिवीगाळ करू लागला तेव्हा जखमीने आरोपीस आमचे नवरा बायकोचे मॅटर आहे आम्ही पाहुन घेऊ तुम्ही शिव्या देवु नका असे म्हणुन घरामध्ये असलेल्या पत्नी सोबत बोलायला गेला व तिला ‘‘गावाले चालते का ’’असे म्हणाला तेव्हा तिने आज येत नाही उदया येईल तेव्हा आरोपीने पुन्हा जखमीला शिवीगाळ करू लागला. जखमीने सुध्दा शिवीगाळ करण्यास सुरवात केली असता आरोपीने त्यास थांब तुझ्यात कीती रंगदारी आहे असे म्हणुन नेसलेल्या धोतरातुन चाकु काढुन जखमीच्या पोटात खुपसुन गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, २९४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक नागवे पोस्टे सावनेर मो. क्र. ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

### जबरी संभोग

पो.स्टे. भिवापूर :— दिनांक २६/०६/२०२३ चे ११.३० वा. सुमारास अल्पवयीन पिडीत/फिर्यादी वय १७ वर्ष ०७ महिने हिच्या घरचे सर्व लग्नाला गेले असताना पिडीता/फिर्यादी ही एकटीच घरी असताना यातील फिर्यादी ही आपली आजी हिला बघण्यासाठी घराबाहेर निघाली असता **आरोपी नामे— सागर जनार्धन राउत, वय २२ वर्ष, रा. टाका पो. जवळी ता. भिवापुर जिल्हा नागपुर** यानी फिर्यादी हीला उचलुन आपले घरी घेवुन गेला. घराचा दरवाजा बंद करून बेडरूममध्ये नेवुन पिडीतेशी जबरदस्तीने जबरी संभोग केला. आरोपीला पिडीता/फिर्यादी ही महार जातीची आहे हे माहीत असतांनाही सुध्दा फिर्यादीशी जबरी संभोग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द ३७६ भांदवि., सहकलम ४ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा, सहकलम ३(१) (w) (i) ३ (1) (w) (ii) 3 (2) (v) अनुसुचित जाती जमाती प्रतिबंधक अधिनियम कायदयान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड श्री. राजा पवार हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर